● वर्ष : ०३ ● अंक : ०५९ ● पुणे ● मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

# राजधानी हादरली




# लाल किल्ल्याजवळ भीषण स्फोट; दहशतवादी हल्ल्याचा संशय

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

ऐतिहासिक लाल किल्ल्याचा सदैव गजबजलेला परिसर सोमवारी सायंकाळी एका कारमध्ये झालेल्या स्फोटाने हादरून गेला. लाल किल्ला मेट्रो स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या सिग्नलजवळ झालेल्या घटनेत आतापर्यंत दहा जणांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी आहेत. जम्मू-काश्मीरमधील मोहिमेतून घातपाताचा मोठा कट उधळून लावल्याचा दावा तीन राज्यांचे पोलीस करत असताना झालेला हा स्फोट दहशतवादी कृत्य आहे की नाही, याबाबत केंद्र सरकार किंवा तपास यंत्रणांनी अधिकृत माहिती दिलेली नाही. मात्र, १४ वर्षांनंतर दिल्लीत घडलेल्या स्फोटाच्या घटनेचा सर्व बाजूंनी तपास करण्यात येत आहे. मुंबईसह देशभरातील प्रमुख शहरांत या घटनेनंतर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी रात्री घटनास्थळी जाऊन पाहणी केली तसेच राष्ट्रीय तपास संस्थेला (एनआयए) तपासाचे आदेश दिले. एनआयएसह, न्यायवैद्याक प्रयोगशाळा, 'एनएसजी', उत्तर प्रदेश 'एटीएस' अशा विविध यंत्रणांनी घटनास्थळी तपासकार्य सुरू केले आहे.

दिल्लीचे पोलीस आयुक्त सतीश गोलचा यांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ६.५२च्या सुमारास 'ह्युदाइ आय ट्वेंटी' कारमध्ये हा स्फोट झाला. त्यावेळी कारमध्ये तीनजण बसले होते आणि कार संथपणे सरकत होती. कारमधील स्फोटाचे कारण स्पष्ट झालेले नसले तरी, मृत किंवा जखमींपैकी कुणाच्याही शरीरा छर्रे किंवा तत्सम तीक्ष्ण वस्तू शिरल्याचे आढळले नाही. बॉम्बस्फोटानंतर घटनास्थळ मोठा खड्डा पडतो. तसेही याठिकाणी घडलेले नाही. त्यामुळे बॉम्बस्फोटाबद्दल पोलिसांनी साशंकता व्यक्त केली. अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने या घटनेची जबाबदारी घेतलेली नाही. मात्र, संबंधित कारची नोंदणी नावावर असलेल्या व्यक्तीस हरयाणातून अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दुर्घटनेतील जखमींना नजीकच्या एलएनजेपी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी दोन-तीन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रुग्णालयात जाऊन स्फोटात जखमी झालेल्यांची भेट घेतली आणि त्यांची विचारपूस केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेत बळी गेलेल्यांप्रती शोक व्यक्त केला. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थना मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमधून केली. आपण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत, असेही ते म्हणाले. पंतप्रधानांनी गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.

**काय काय घटना घडल्या?**

१) मोठ्या प्रमाणावर स्फोटकं जप्त करण्यात आलली. हरियाणातल्या फरिदाबाद या ठिकाणी पोलिसांनी ३६० किलो अमोनियम नायट्रेट हे स्फोटक पकडलं. तसंच २५०० किलो स्फोटकांसाठी लागणारी रसायनंही पोलिसांनी जप्त केली आहे. तसंच एक रायफल, तीन मॅगझिन, ८३ जिवंत काडतुसं पोलिसांनी जप्त केली.

२) डॉक्टरसह संशयितांना अटक करण्यात आली. अल फतेह विद्यापीठातील डॉक्टर आणि काही संशयितांना पोलिसांनी अटक केली. मुझम्मील शकील असं अटक करण्यात आलेल्या डॉक्टरचं नाव आहे. तर आदिल अहमद नावाच्या डॉक्टरलाही पोलिसांनी अटक केली. इश्तियाक नावाच्या एका इमामलाही पोलिसांनी अटक केली. जैश ए मोहम्मद, अन्सार गझवा अल हिंद या संघटनांवर बंदी घालण्यात आली आहे. या संघटनांचाच हात फरिदाबादच्या प्रकरणात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दिल्लीवर हल्ला करण्याचे दहशतवाद्यांचे मनसुबे पोलिसांनी उधळून लावले अशी माहितीही समोर आली होती. तरीही दिल्लीत एक स्फोट झाला आहे.

४) पाकिस्तानशी संबंधित हँडलर्सवर कारवाई करण्यात आली आहे. तसंच आणखी शस्त्रं, स्फोटकं आढळून येतात का? यासंदर्भातही पोलिसांचा तपास सुरु आहे.

**दिल्लीतील स्फोटानंतर अमित शाहांची पहिली प्रतिक्रिया**

दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात एका कारमध्ये भीषण स्फोट झाला आहे. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तात्काळ गृहमंत्री अमित शाह यांच्याशी संवाद साधला आणि परिस्थितीचा आढावा घेतला, असे वृत्त सरकारी सूत्रांच्या हवाल्याने हिंदुस्तान टाइम्सने दिले. दरम्यान अमित शाहांनी वृत्तसंस्था एएनआयशी बोलताना या स्फोटाबद्दल माहिती दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, "सुभाष मार्ग ट्राफिक सिग्नलवर आय २० ह्युंदाई गाडीत एक स्फोट झाला आहे. स्फोटामुळे जवळपासच्या गाड्या आणि रस्त्यावरून जाणारे लोक जखमी झाल्याची महिती आहे. प्राथमिक माहितीनुसार काही लोकांचा मृत्यूही झाला आहे. स्फोटाची माहिती मिळताच १० मिनिटांत दिल्ली गुन्हे शाखा, दिल्ली स्पेशल ब्रांचची पथके घटनास्थळावर पोहचली आहेत. एनएसजी आणि एनआयएच्या पथकाने एफएसएलबरोबर सखोल चौकशी सुरू केली आहे", असं अमित शाह यांनी सांगितलं.

"दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या स्फोटाची बातमी खूपच दुःखद आणि चिंताजनक आहे. या दुःखद अपघातात अनेक निष्पाप जीव गमावल्याने दुःख झालं आहे. या दुःखद काळात ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं आहे, त्यांच्या कुटुंबांबरोबर मी आहे आणि माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करतो. सर्व जखमी लवकरात लवकर बरे होतील अशी मी आशा करतो", असं राहुल गांधींनी म्हटलं आहे.

"लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाची बातमी अत्यंत चिंताजनक आहे. काही लोकांना आपला जीव गमवावा लागल्याचं वृत्त आहे आणि हे अत्यंत दुःखद आहे. हा स्फोट कसा झाला आणि त्यामागे काही मोठं षड्यंत्र आहे का? याची चौकशी पोलीस आणि सरकारने तातडीने करावी. दिल्लीच्या सुरक्षेबाबत निष्काळजीपणा सहन केला जाऊ शकत नाही", असं माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं आहे.

शरद पवार म्हणाले की, "आज दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळील सुभाष मार्ग ट्रॅफिक सिग्नल परिसरात एका कारमध्ये झालेल्या स्फोटात झालेली जीवितहानी अतीव दुःखद आहे. मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो व ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले त्यांच्याप्रती सहवेदना व्यक्त करतो. तसंच, जखमी नागरिकांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना करतो."

दरम्यान पुढे शरद पवारांनी घडलेल्या घटनेबद्दल चिंता देखील व्यक्त केली आहे. जुन्या दिल्लीतील अत्यंत गर्दीच्या ठिकाणी ही स्फोटाची घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी ही घटना चिंताजनक असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले "लाल किल्ल्यासारख्या संवेदनशील परिसरात घडलेली ही दुर्दैवी घटना फार चिंताजनक आहे. माझी देशाचे पंतप्रधान व गृहमंत्र्यांना विनंती आहे की, सदर घटनेबाबत सखोल चौकशी करावी. त्यायोगे येणारा चौकशी अहवाल देशासमोर ठेवून अशा दुर्घटना रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या यंत्रणा सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावलं उचलतील अशी अपेक्षा व्यक्त करतो."

दिल्लीत झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र, उत्तर प्रदेश हरियाणा, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. राजधानी दिल्लीत झालेल्या भीषण बॉम्बस्फोटानंतर त्याचे तीव्र पडसाद देशभरात उमटले असून, अनेक राज्यांमध्ये हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणा, केरळ या राज्यांसह केंद्रशासित प्रदेश चंदीगडमध्येही सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आली आहे. संवेदनशील ठिकाणी पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला असून, कसून तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दिल्लीतील स्फोटानंतर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी देशातील प्रमुख राज्यांनी तातडीने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. रेल्वे स्थानके, बस स्थानके, बाजारपेठा आणि इतर गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली असून, संशयास्पद हालचालींवर बारीक नजर ठेवली जात आहे.

दिल्ली स्फोटात उत्तर प्रदेशातील अमरोहा येथील हसनपूरचे रहिवासी अशोक कुमार यांचा मृत्यू झाला. देवरिया येथील रहिवासी शिवा जैस्वाल, आग्रा येथील पप्पू आणि गाझियाबाद येथील मोहम्मद दाऊद हेदेखील जखमी झाले.

राजधानी दिल्लीत सोमवारी सायंकाळी सातच्या सुमारास झालेल्या भीषण स्फोटाला कारणीभूत ठरलेली ह्युंदाईची आय-20 ही कार हरियाणात नोंदणी झाली असून, तिचा क्रमांक एच.आर. 26 - 7674 असा आहे. ही कार नदीम खानच्या नावावर असून, तिचा मूळ मालक सलमान होता. सलमानने ही कार ओखला येथील देवेंद्र नावाच्या व्यक्तीला विकली होती, असे पोलिसांनी सांगितले. आता यासंदर्भात आणखी चौकशीसाठी सुरक्षा यंत्रणांची पथके हरियाणाला रवाना झाली आहेत.कारण, या कारच्या मालकाचा छडा लागल्यानंतरच या स्फोटामागील गूढ उलगडणार आहे.

## महाराष्ट्रात सतर्कतेचा इशारा, सुरक्षेत वाढ

दिल्लीतील स्फोटानंतर महाराष्ट्रात सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे. मुंबईत विशेष खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अप्रिय घटना टाळण्यासाठी जिल्हा पोलीस- प्रमुख आणि शहरांचे पोलीस आयुक्त यांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे, असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

## सिग्नलवर गाडी थांबली, ड्रायव्हर उतरला

राजधानी दिल्लीत सोमवारी संध्याकाळी एका कारमध्ये झालेल्या भीषण स्फोटाने मोठी खळबळ उडाली आहे. हळुवार येऊन सिग्नलवर थांबलेल्या कारमध्ये हा स्फोट झाला. दिल्लीचे पोलिस आयुक्त सतीश गोलचा यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. त्यांनी सांगितले की, सोमवारी सायंकाळी सुमारे 6 वाजून 52 मिनिटांनी कमी वेगाने चाललेली गाडी रेड सिग्नलवर थांबली, त्यातून ड्रायव्हर खाली उतरला अन् त्याचवेळी गाडीत शक्तिशाली स्फोट झाला. स्फोट इतका भीषण होता की, आजूबाजूला उभ्या असलेल्या इतर गाड्यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

## पंतप्रधान मोदींनी काय म्हटलं?

"आज संध्याकाळी दिल्लीत झालेल्या स्फोटात ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं आहे, त्यांच्याप्रती संवेदना व्यक्त करतो. जखमी लवकरात लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना करतो. बाधितांना अधिकाऱ्यांकडून मदत केली जात आहे. गृहमंत्री अमित शाह आणि इतर अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेतला आहे", असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.



## मृतदेहाचे तुकडे विखुरले; रक्तमांसाचा चिखल झाला!

घटनास्थळी एका मृतदेहाचे तुकडे इतस्ततः विखुरले; रक्तमांसाचा चिखल झाला असल्याचे काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. एक स्थानिक दुकानदार म्हणाले की, मी माझ्या दुकानात खुर्चीवर बसलो होतो. अचानक जोरात आवाज आला. हा आवाज इतका प्रचंड होता की, मी बसल्या जागेवरून खाली पडलो. त्यानंतर स्वतःला कसाबसा सावरून भीतीने लांब पळालो. माझ्यासह अवतीभोवतीचे लोकही पळू लागले. अन्य एका स्थानिक रहिवाशाने सांगितले की, मी टेरेसवर होतो. अचानक मोठा आवाज झाला आणि काही क्षणात मोठी आग बघितली. स्फोट इतका भीषण होता की, आमच्या घराच्या अनेक काचा फुटल्या.

## स्फोटाचे कारण अद्याप अस्पष्ट

पोलिसांनी परिसर ताब्यात घेतला आहे. अन्य सुरक्षा यंत्रणाही घटनास्थळी दाखल झाल्या. पुरावे गोळा करण्याचे काम सुरू करण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, स्फोट कारमध्ये झाला. मात्र, त्याचे स्वरूप समजले नव्हते. लाल किल्ला आणि चांदणी चौक परिसरात प्रचंड सुरक्षा तैनात करण्यात आली आहे.






# ‘वंदे मातरम्’चा विवाद

वंदे मातरम् हे आपले राष्ट्रगीत होणार होते. स्वातंत्र्यपूर्वीपासून तसेच ठरले होते. पण पंडित नेहरू यांनी जे आपल्या देशाचे पहिले पंतप्रधान राहिले त्यांनी मुस्लिमांना खूश करण्यासाठी आणि मुस्लीम व्होट बँक जपण्यासाठी वंदे मातरम् हे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यास नकार दिला आणि मग जनगनमन हे आपले राष्ट्रगीत झाले. पण तो वाद तेव्हाही तसाच होता, तो अद्यापही सुटला नाही. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देशभर भाजपच्या वतीने विशेष कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले आहे. अर्थात यास ममता बॅनर्जी यांनी विरोध केला आहे आणि त्यामागे कारण हे निव्वळ राजकीय आहे. वास्तविक वंदे मातरम् हे भारतमातेचे गायन आहे आणि त्याबद्दल कुणालाही आक्षेप असण्याचे कारण नाही. पण मुस्लिमांनी या गीताला १९३७ मध्येही आक्षेप घेतला होता आणि आजही मुस्लिमांना या गीताबद्दल आक्षेप असल्यामुळे देशभर नाही तर किमान बंगालमध्ये वंदे मातरमवरून वाद निर्माण झाला आहे. ममता बॅनर्जी यांनी आणि त्यांच्या संपूर्ण पक्षाने या वादावर मौन पाळले आहे. ममता यांच्या या मौनाचा अर्थ उघड आहे. कारण ममता यांची सारी मदार मुस्लीम आणि रोहिंग्य मतदारांवर आहे.

वंदे मातरम् हे गीत लिहिले होते बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी आणि त्यामुळे भाजपने या प्रकरणी बंगाली अस्मितेचा मुद्दा जोडून आगामी विधानसभा निवडणुका लढवण्याची खेळी खेळली आहे. ही खेळी ममता यांना अडचणीत आणू शकते. म्हणूनच त्यांनी या मुद्द्यावर सोयीस्कर मौन पाळले आहे. हे गीत बंगाली अस्मितेशी जोडले गेले आहे आणि ते बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिले असले तरीही ते गायले आहे रवींद्रनाथ टागोर यांनी. १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली तेव्हा वंदे मातरम् हेच गीत राष्ट्रवाद्यांचा आवाज बनला होता. पण ममता यांनी गीताच्या निमित्ताने उपस्थित झालेल्या वादावर मौन पाळले आहे. त्याचे कारण आहे की या गीताचा मूळ स्वरूपातील स्वीकार किंवा विरोध करणे तृणमूल काँग्रेसला शक्य नाही. बंगालमध्ये आज ३७ टक्के मुस्लीम आहेत. भारतमातेचे दैवतीकरण करण्यास आणि हे गीत मुस्लीम विरोधी आहे असे भासवण्याचा प्रयत्न अल्पसंख्याकांनी सातत्याने केला आहे. या विरोधाचे मूळ इस्लाम धर्मात आहे कारण मुसलमान अल्लाशिवाय कुणाचीही पूजा करत नाही. तसे करण्यास त्याला मनाई आहे. या विरोधातून अल्पसंख्याकांचा वंदे मातरम् गीताला विरोध झाला आहे. आणि काँग्रेस इतकी वर्षे अल्पसंख्याकांच्या मतांवरच निवडून येत होती त्यामुळे अल्पसंख्याकांच्या विरोधाला डावलून




काँग्रेसला काहीच करता येणे शक्य नव्हते. अर्थात अल्पसंख्याकांच्या विरोधाचा मुद्दा बाजूला ठेवला तरीही वास्तविक पहाता वंदे मातरम् गीताला आदर देण्यात काहीच आक्षेपार्ह नाही. कारण यात भारत मातेची प्रार्थना आहे. पहिल्या प्रथम हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या आनंदमठ या कादंबरीत अवतीर्ण झाले आणि त्यानंतर प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकाचा तो श्वास बनला. याच वादामुळे काँग्रेसचे देशात अधिवेशन भरले तेव्हा १९३७ मध्ये वंदे मातरमचे पहिली दोन कडवी फक्त स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. अनेक मुस्लिमांचा या गीताला आक्षेप आहे पण अब्दुल रहेमान अंतुले यांच्यासारखे काही मुस्लीम असेही नेते होते की ज्यांनी मातृभूमीसाठी हे देशभक्तीपर गीत आहे, असे मानत होते. ममता यांची अडचण वेगळीच आहे. मुस्लीम लीगने सर्वप्रथम या गीताला विरोध केला होता. ममता यांनीच वास्तविक वंदे मातरम् शाळा आणि सार्वजनिक स्थळांवर गायन करणे अनिवार्य करण्याची मागणी केली होती पण आज त्यांनी या वादावर सोयीस्कर मौन पाळले आहे. कारण एक तर हे गीत बंगाली अस्मितेशी जोडले गेले आहे. दुसरे म्हणजे ममता यांचा भर मुख्यतः मुस्लीम आणि रोहिंग्य मतदारांवर आहे. त्यामुळे त्या दोघांनाही दुखवता येत नाही. हे गीत आज भाजप आणि काँग्रेस यांच्यातील वादविवादाचे कारण बनले आहे. पंडित नेहरू यांनी सुभाषचंद्र बोस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, की या गीतामुळे अल्पसंख्याकांच्या नाराजीचे कारण होऊ शकते. राष्ट्राला प्रेरणा देणाऱ्या गीतावरून वाद निर्माण व्हावा यासारखे दुर्दैव नाही. कारण काँग्रेसने गेली कित्येक वर्षे हिंदू धर्माचे प्रेरणास्रोत आणि हिंदू धर्माला नेहमीच दुय्यम लेखले आहे. अल्पसंख्याकांच्या एकगठ्ठा मतांवर सत्ता हस्तगत केली होती. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सत्तास्थानी येताच हिंदू जागा झाला आणि काँग्रेसने येथील इतिहास कसा दडपून टाकला याचा पर्दाफाश करण्यास सुरुवात केली, म्हणून काँग्रेस असो की तृणमूल काँग्रेस असो की अल्पसंख्याक असोत, याच्या देशद्रोही कारवाया जनतेसमोर आल्या आहेत आणि त्याचमुळे ही मंडळी बॅकफुटवर गेली आहेत.

काँग्रेस आणि वंदे मातरमचा हा वाद जुनाच आहे. पंडित नेहरूंनी जाणीवपूर्वक वंदे मातरमची दोन कडवी वगळली होती. कारण त्यात माँ दुर्गादेवीची स्तुती केली आहे. नेहरूंच्या निधर्मी राजकारणाला हे साजेसे नव्हते त्यामुळे ही कडवी वगळण्याचा त्यांच्या कार्यकाळात सरकारने हा निर्णय घेतला. हा आरोप भाजपने केला म्हणून तो राजकीय आहे असे नाही, तर त्यात वास्तव आहे. वंदे मातरम गीत कोणत्याही एका धर्माचे नाही. या गीतावरून आताच वाद होण्याचे कारण म्हणजे बंगालमध्ये होऊ घातलेल्या २०२६ मधील निवडणुका.

त्यात ममता यांचा पक्षाची थेट लढत भाजपशी होत आहे आणि त्यामुळेच ममता यांनी विरोधी नेत्यांना कठोर शब्द बाण वापरत टीका करण्याचे धोरण अवलंबिले आहे. ममता यांनी आपण हिंदू असल्याचे विधानसभेत जाहीर केले होते. पण त्यांनी वेळोवेळी अल्पसंख्याक आणि रोहिंग्यांच्या हिताची भूमिका घेतली. त्यामुळे यावेळी त्यांना काय भूमिका घ्यावी हा पेच पडला असावा. ममता यांची दुटप्पी भूमिका तेव्हाच उघड झाली होती जेव्हा त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना वंदे मातरम गीत गाऊ नका असे सांगितले. वंदे मातरम राष्ट्राला स्फूर्ती देणाऱ्या गीताला आज १५० वर्षे साजरी होत असताना केवळ अल्पसंख्यांकांना खुश करण्यासाठी विरोध केला जात आहे हे देशाची प्रतिमा उंचावणारी बाब नाही. वंदे मातरम हे राष्ट्राचे प्रेरक गीत आहे आणि त्याचे स्थान तसेच राहिले पाहिजे.

# पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागा

- **राजाभाऊ राऊत यांचे कार्यकर्त्यांना आवाहन!!**
- **बार्शी नगरपरिषद निवडणूक २०२५ : भाजपा महायुतीची उत्साही बैठक संपन्न**



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

आगामी बार्शी नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर भाजपा महायुतीच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती व विचारविनिमय बैठक आज अत्यंत उत्साहात पार पडली.

या बैठकीस सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. जयकुमार भाऊ गोरे साहेब तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या वेळी उपस्थित नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन करताना सांगितले की,

“आगामी नगरपालिका तसेच सर्व निवडणुकांमध्ये आपण सर्वांनी एकजुटीने लढा द्यावा. जनतेच्या विश्वासाला उतरून विकासाच्या वाटेवर बार्शीला पुढे नेऊया.”

या बैठकीस शिवसेना चे विजय माने, आर.पी.आय. चे ॲड. अविनाश गायकवाड, माजी नगराध्यक्ष ॲड. आसिफभाई तांबोळी, रमेश आण्णा पाटील, रावसाहेब मनगिरे मालक, विलास आप्पा रेनके, भारत पवार सर, पी. एम. मनगिरे सर, बाबासाहेब कापसे, मदन दराडे सर, आणि बालाजी गडदे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत राजेभाऊंनी सांगितले की, “महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी एकत्र येऊन जनतेचा विश्वास संपादन करावा आणि विकासाच्या कार्यात पुढाकार घ्यावा.”

बैठकीचे वातावरण उत्साहपूर्ण आणि ऐक्याचे दर्शन घडवणारे होते. भाजपा महायुतीच्या संघटित तयारीमुळे आगामी बार्शी नगरपरिषद निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून आले.

## नगरपरिषदेसाठी पहिल्या दिवशी ६६४ उमेदवारांचे अर्ज

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रणधुमाळीला आजपासून सुरूवात झाली आहे. निवडणूक होत असलेल्या २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता आजपासून नामनिर्देशपत्र सादर करण्यास सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी ६६४ उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने आपले अर्ज दाखल केले. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांतील उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र दाखल करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecelec.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र दाखल करता येईल. एका नोंदणीद्वारे संबंधित प्रभागात एका उमेदवारास चार नामनिर्देशनपत्र दाखल करता येऊ शकतील. संकेतस्थळावर संपूर्ण नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरल्यानंतर त्याची मुद्रित प्रत काढून त्यावर स्वाक्षरी करावी लागेल. त्यानंतर ती प्रत विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे आवश्यक राहील. इच्छूक उमेदवारांनी आताच ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करून घ्यावी व आपला लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्याकडे जपून ठेवावा. कारण संपूर्ण नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्र भरण्यासाठी ते आवश्यक आहेत. आताच ऑनालाईन नोंदणी करून ठेवल्यास ऐनवेळी होणारी धावपळ टळू शकेल. नामनिर्देशनपत्रांतील आणि शपथपत्रांतील संपूर्ण माहिती भरल्यानंतर प्रिंटआऊटवर सही करून ती संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे सुलभ होईल.

## गुंतवणूकदारांना बाजारातील उच्चांक गाठण्यास मदत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चॉईस इंटरनॅशनल लिमिटेडच्या ब्रोकिंग व्हर्टिकल चॉईस इक्विटी ब्रोकिंगने झी बिझनेसच्या सहकार्याने पुण्यात गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला. हा कार्यक्रम भरोसे की चॉईसचा नोव्हेंबर २०२४ मध्ये सुरू झालेल्या कंपनीच्या प्रमुख गुंतवणूकदार शिक्षण उपक्रमाचा एक भाग होता. या पॅनेलमध्ये डीएसपी म्युच्युअल फंडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कल्पेन पारेख; चॉइस इंटरनॅशनल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री कमल पोद्दार, आणि झी बिझनेसचे व्यवस्थापकीय संपादक श्री अनिल सिंघवी यांचा समावेश होता. त्यांनी एकत्रितपणे बाजारपेठेतील बदलत्या गतिमान, दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याची धोरणे आणि शिस्तबद्ध गुंतवणुकीचे महत्त्व यावर विस्तृत चर्चा केली. या कार्यक्रमात पुण्यातील गुंतवणूकदार समूहाचा मोठा सहभाग दिसून आला, ज्यांनी तज्ज्ञांशी संवाद साधला आणि आजच्या विक्रमी उच्चांकी बाजारपेठांमध्ये नेव्हिगेट करण्यासाठी व्यावहारिक ज्ञान मिळवले.

## प्रयेजा सिटीजवळील पर्यायी मार्गावरील ओढ्याचा पूल धोकादायक

**तातडीने दुरुस्तीची मागणी**



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्त्याला पर्यायी म्हणून वापरल्या जाणाऱ्या शरद हॉस्पिटलकडून प्रयेजा सिटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या ओढ्यावरील पुलाची अत्यंत गंभीर अवस्था असून याबाबत पुणे महानगरपालिकेचे मुख्य अभियंता प्रकल्प अधिकारी यांना शिवसेना (उबाठा) विभागप्रमुख महेश पोकळे यांनी निवेदन देऊन हा पूल अत्यंत अरुंद, जुना आणि कमकुवत झाल्यामुळे तो दैनंदिन वाहतुकीसाठी धोकादायक ठरत असल्याचे म्हटले आहे.

हा रस्ता प्रयेजा सिटी, धायरी, खडकवासला आणि नांदोशी परिसरातील नागरिकांसाठी प्रमुख संपर्कमार्ग आहे. या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुलाची रुंदी अत्यंत कमी असल्यामुळे चारचाकी आणि दुचाकी वाहने एकाचवेळी जाऊ शकत नाहीत. परिणामी, या ठिकाणी दररोज मोठी वाहतूक कोंडी होते.

या मार्गावरून शाळेची वाहने, पी.एम.पी.एम.एल. बस, तसेच ॲम्ब्युलन्स आणि फायर ब्रिगेड यासारखी आपत्कालीन वाहने नियमितपणे ये-जा करतात. पुलाची सद्यस्थिती पाहता, अशा महत्त्वाच्या वाहनांना अडथळा निर्माण होऊन मोठा धोका होण्याची शक्यता आहे. पुलाची कमकुवत झालेली रचना पाहता, कोणत्याही क्षणी अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या धोकादायक पुलासंदर्भात महेश पोकळे यांनी यापूर्वीही वेळोवेळी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्याप यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुरळीत वाहतुकीसाठी या पुलाची तात्काळ पाहणी करावी. पाहणीनंतर, आवश्यक ती दुरुस्ती, मजबुतीकरण करावे किंवा वाढत्या रहदारीचा विचार करून नवीन पूल उभारणीची कार्यवाही तातडीने करावी.

या महत्त्वाच्या मागणीकडे पुणे महानगरपालिका प्रशासन कधी लक्ष देणार आणि नागरिकांना वाहतूक कोंडीतून व अपघाताच्या भीतीतून कधी मुक्ती मिळणार, याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

# जनतेसाठी ‘हक्काचा बापू’ म्हणजे रमेशबापू गायकवाड

## जनसेवा हीच ईश्वरसेवा मानणारा कार्यकर्ता म्हणून ओळख

**मिशन महानगरपालिका**

**रमेशबापू गायकवाड**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

**खडकवासला विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्यांच्या मनात विश्वास आणि आपुलकीने स्थान मिळवणारे नाव म्हणजे भाजपा ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड. दैनिक आरंभपर्व पुणेच्या ‘मिशन महानगरपालिका 2025’ या विशेष सदरामध्ये त्यांच्याशी संवाद साधला.**

सामान्य नागरिकांच्या प्रश्नांपासून ते सामाजिक कार्यापर्यंत रमेश बापू गायकवाड हे नेहमी आघाडीवर राहिले आहेत.

लोक त्यांना प्रेमाने “हक्काचा बापू” म्हणतात  कारण त्यांनी केवळ शब्दांनी नव्हे, तर कृतीने जनसेवेचं खरं उदाहरण घालून दिलं आहे.

त्यांचा सेवाभाव आणि समाजाशी असलेला जिव्हाळा हीच त्यांची खरी ओळख आहे. त्यांनी केवळ राजकारण नव्हे, तर माणसांसाठी जगणं हे आपलं ध्येय मानलं आहे.

गायकवाड यांनी गेल्या काही महिन्यांत अनेक सामाजिक उपक्रम राबवले, ज्यामुळे त्यांच्या कार्याची दखल संपूर्ण जनतेने घेतली .

विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून शिक्षणास प्रोत्साहन दिलं. रक्षाबंधनानिमित्त महिलांना साडी वाटप करून समाजात सन्मानाचा संदेश दिला. व्यसनमुक्ती केंद्रात दूध वाटप करून आरोग्य आणि पुनर्वसनासाठी मदतीचा हात दिला.

वाढदिवसानिमित्त वारकरी संस्थेला अकरा हजार रुपयांची आर्थिक मदत देऊन संत परंपरेचा सन्मान जपला. वृद्धश्रमातील वृद्धांना फळे वाटप करून मानवीतेचा खरा अर्थ दाखवला.



पूरग्रस्त महिलेचं घर कोसळल्यानंतर तिला एक लाख रुपयांची मदत करून तिच्या कुटुंबाला आधार दिला. आणि भाजपा मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी सांगितल्यानंतर एका कार्यासाठी तत्काळ एक लाख रुपयांची मदत केली. या सर्व कृतींमुळे रमेश बापू गायकवाड हे आज “माणसांच्या वेदना ओळखणारे आणि त्यांच्या मदतीला धावून जाणारे नेते” म्हणून लोकांच्या मनात स्थान मिळवत आहेत.

त्यांनी बोलताना सांगितले की. “समाजात बदल घडवायचा असेल तर कृती आवश्यक आहे.

मी राजकारणासाठी नाही, तर माणुसकीसाठी काम करतो. पक्ष जो निर्णय घेईल, तो माझ्यासाठी अंतिम आहे. जनतेचा विश्वास हेच माझं खरं बळ आहे.” प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणं हे माझं कर्तव्य मानतो. जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद मिळवणं हेच माझं खरं यश आहे.

भाजपा ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष म्हणून त्यांनी समाजातील मागासवर्गीय घटकांसाठी ठोस पावले उचलली. शासनाच्या विविध योजना खऱ्या गरजूंना मिळाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

त्यांचा साधेपणा, पारदर्शकता आणि मदतीची तत्परता ही त्यांच्या लोकप्रियतेची प्रमुख कारणं आहेत.

त्यांचं काम राजकीय पातळीवर जितकं प्रभावी आहे, तितकंच ते सामाजिक दृष्टीने प्रेरणादायी आहे.

“रमेश बापू म्हणजे आमच्यासाठी खरी माणूसकी. अडचण आली की ते सर्वात आधी पोहोचतात.आमच्या परिसराचे ‘हक्काचे बापू’ आहेत. मी आजपर्यंत सहकार्य खूप काही केले आहे. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीत रमेश बापू गायकवाड यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ते सर्वपक्षीय नेत्यांमध्ये सुद्धा आदराने पाहिले जातात. त्यांच्या कार्यपद्धतीत राजकारणापेक्षा जनतेची सेवा हा केंद्रबिंदू कायम राहिला आहे. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी पक्षाने संधी देईल त्या प्रभागात निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले. पक्ष सांगल ती जबाबदारी स्वीकारून काम करणार. असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### डॉ. जनार्दन भोसले यांना राजस्तरीय आदर्श समाजरत्न पुरस्कार प्रदान

**पुणे (आरंभ पर्व) : डॉ . जनार्दन पांडुरंग भोसले यांना महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. वडूज तालुका खटाव येथील सौभाग्य मंगल कार्यालय येथे डीएसपी DSP न्यूज लाईव्ह चॅनलचा प्रथम वर्धापन दिन व महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळा आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री नामदार जयकुमार गोरे (भाऊ) यांच्या हस्ते तसेच आरोग्य क्षेत्रात आरोग्य दूत ,सामाजिक बांधिलकी ,रुग्ण सेवा या कार्यसाठी शिवसेना उप शहर प्रमुख श्री राजाभाऊ भिलारे यांना महाराष्ट्रभूषण राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे भाऊ , DSP न्यूज Live चॅनेलचे संपादक श्री.दत्तात्रय फाळके , मराठी चित्रपट सूड शकारंभ टिम , पिचली माझी बांगडी फेम गायत्री साळवे , रडू नको बाळा फेम बालगायिका ह.भ.प शिवानीताई शिंदे, महाराष्ट्रातील उत्कृष्ट लेडी डीजे ऑपरेटर वैभवी कांबळे उर्फ डीजे छकुली, भाजप जेष्ठ मार्गदर्शक बंडा गोडसे सर , भाजप खटाव तालुका अध्यक्ष अनिल माळी , वडूज पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे, भाजप खटाव तालुका माजी अध्यक्ष धनंजय चव्हाण इत्यादी मान्यवर उपस्थित होते.**

### डॉ. सुरेश खटावकर यांचे निधन; आरोग्यसेवेचा आधारवड हरपला



**पुणे (आरंभ पर्व) : गंगाधाम मार्केट यार्ड येथील सुप्रसिद्ध वैद्यकीय व्यक्तिमत्व डॉ. सुरेश खटावकर (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे सुपे परिसरासह पुणे शहरात हळहळ व्यक्त होत आहे. डॉ. खटावकर हे काशीबाई नवले रक्तपेढीचे प्रमुख डॉ. राजीव खटावकर यांचे वडील होत. त्यांनी गेली अनेक दशके सुपे परिसरात वैद्यकीय सेवेसाठी आपले आयुष्य वाहून घेतले. ग्रामीण भागात आरोग्य सुविधांचा अभाव असताना त्यांनी गोरगरिबांना मोफत उपचार देऊन “सेवाच धर्म” या तत्त्वाचे पालन केले. अचूक निदान, रुग्णाशी आपुलकी, आणि समाजासाठीचे योगदान यामुळे डॉ. खटावकर हे सर्वांच्या मनात विश्वासाचे प्रतीक बनले होते. त्यांच्या निधनाने सुपे परिसराने खरा सेवाभावी डॉक्टर आणि आरोग्यसेवेचा आधारवड गमावला.**

### स्कूटरसारख्या सोयी असणारी - ‘एन-फर्स्ट’ ईव्ही ‘न्युमरस’ तर्फे सादर



**पुणे (आरंभ पर्व) : विद्युत वाहन निर्मिती क्षेत्रातील देशातील आघाडीच्या नवोन्मेषक कंपन्यांपैकी एक असलेल्या ‘न्युमरस मोटर्स’ने आज बेंगलुरूमध्ये आपली दुसरी इलेक्ट्रिक दुचाकी ‘एन-फर्स्ट’ सादर केली. बाईकची स्थिरता आणि स्कूटरची उपयुक्तता यांचा संगम असलेले हे वाहन खासकरून तरुण शहरी प्रवासी आणि महिलांसाठी डिझाइन करण्यात आले आहे. ‘एन-फर्स्ट’ची प्रारंभिक किंमत ₹६४,९९९ इतकी ठेवण्यात आली असून ती फक्त पहिल्या १,००० खरेदीदारांसाठी लागू असेल. “चेंज युवर व्हाइब” या घोषवाक्याखाली सादर केलेले हे मॉडेल परवडणारे, स्वच्छ आणि आकर्षक शहरी वाहतुकीचे नवे प्रतीक ठरणार आहे. व्हीलॅब (इटली) या डिझाइन हाऊसच्या सहकार्याने तयार केलेल्या या मॉडेलमध्ये ‘मेड-इन-इंडिया’ अभियांत्रिकी आणि जागतिक डिझाइन सौंदर्यदृष्टी यांचा सुंदर संगम आहे. न्युमरस मोटर्सचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रेयस शिबुलाल यांनी सांगितले, ““एन-फर्स्ट’ हे केवळ एक नवीन मॉडेल नाही, तर विद्युत वाहनांविषयीचा दृष्टिकोन बदलणारे एक विचार आहे. शहरी वाहतुकीत नव्या पिढीच्या गरजा आणि शैली यांचा संगम साधणारे हे वाहन आहे.”**




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५






# खडकवासला : अतिक्रमणांचा फटका आता अधिकाऱ्यांनाच!

## पाटबंधारे विभागातील तीन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस; निलंबनाची शक्यता

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला, पानशेत आणि वरसगाव धरण परिसरातील अतिक्रमणांवर मागील अनेक वर्षांपासून राजकीय दबावामुळे कारवाई थांबवली जात होती. मात्र आता या प्रकरणानेच पाटबंधारे विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना अडचणीत आणले आहे.

धरण परिसरातील अनधिकृत बांधकामांवरील विलंबित कारवाईबाबत विभागातील तीन अधिकाऱ्यांना शासनाने कारणे दाखवा नोटीस बजावली असून, निलंबनाची कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी २६ एप्रिल २०२५ रोजी वरसगाव धरणाला भेट देत, खडकवासला, पानशेत आणि वरसगाव परिसरातील अतिक्रमणांचे तातडीने सर्वेक्षण करून कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते.



तरीदेखील प्रत्यक्ष कारवाई न झाल्याने ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या आढावा बैठकीत मंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर पुणे पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे आणि उपअभियंता मोहन भदाणे यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांनी समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्याने आणि जबाबदारी एकमेकांवर ढकलल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

स्थानिक नागरिकांनी मात्र शासनाकडे मागणी केली आहे की, गरीब शेतकऱ्यांवरील कारवाई जितक्या तत्परतेने केली जाते, तितक्याच कठोरतेने रिसॉर्ट्स, फार्महाऊस आणि हॉटेल्सवरील अतिक्रमणांवरही कारवाई करावी. अन्यथा ही नोटीस फक्त दिखाऊ कारवाई ठरेल, असा जनतेचा सूर आहे.

### स्थानिक शेतकऱ्यांवर कारवाई, धनदांडग्यांवर माया

**आमदार भीमराव तापकीर यांनी पावसाळी अधिवेशनात या विषयावर प्रश्न उपस्थित करत प्रशासनावर थेट टीका केली होती. शेतकऱ्यांची राहण्यासाठी बांधलेली घरे एका दिवसात जमीनदोस्त केली जातात, पण धरणाजवळ उभारलेली हॉटेल्स, रिसॉर्ट्स मात्र शाबूत राहतात — अशी तिखट टीका त्यांनी केली होती. या मुद्द्यामुळे प्रशासनावर पक्षीय आणि जनतेचा दबाव वाढला आहे.**

### निलंबनाची टांगती तलवार

**सूत्रांच्या माहितीनुसार, समाधानकारक खुलासा न झाल्यास या अधिकाऱ्यांवर निलंबन आणि विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे आदेश देण्यात आले आहेत. धरण परिसरातील अतिक्रमणांचे प्रमाण आणि त्यामागील राजकीय हस्तक्षेप यामुळे हे प्रकरण अधिकच गाजण्याची शक्यता आहे.**

# हरिदास चरवड यांच्यातर्फे विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

- **“फिरते वाचनालय” आणि “रक्तदान शिबिर”ला तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग!**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहराचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मा. मुरलीधर मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक येथे सामाजिक बांधिलकी आणि ज्ञानप्रेमाचा सुंदर संगम पाहायला मिळाला. माजी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या पुढाकाराने “रक्तदान शिबिर” आणि “फिरते वाचनालय” हे दोन अर्थपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात आले.सिंहगड रोडवरील या रक्तदान शिबिराला तरुण आणि विशेषतः तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात तब्बल १५० रक्तपिशव्या संकलित झाल्या.

रक्तदान शिबिराचे आयोजन रेड प्लस ब्लड बँकेच्या सहकार्याने करण्यात आले होते. यावेळी बोलताना आयोजक माजी नगरसेवक हरिदास चरवड म्हणाले,“रक्तदान हे केवळ दान नव्हे; प्रत्येक थेंबात नवजीवनाचे सामर्थ्य आणि समाजासाठीची जबाबदारी दडलेली असते.” या प्रसंगी भाजपा शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, बाळासाहेब जाधव, हरिदास लगड, अनिल चरवड,शिवाजी येवले, डॉ. विवेक काळे, विद्याचरण मनेरे, सचिन मनेरे, ॲड. सागर चंदनशिवे, सुनील चरवड, चंद्रकांत पवळे, आकाश लोणारे, केदार जाधव, तसेच रेड प्लस ब्लड बँकेचे वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.




# प्रभागाच्या विकासाचे राजकारण करणार : संतोष मते







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीचा ताप वाढू लागला असून, सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांच्या माध्यमातून प्रचाराची रणधुमाळी सुरू केली आहे. अनेक इच्छुक उमेदवार प्रभागाच्या विकासाचे व्हिजन घेऊन मैदानात उतरले आहेत.

या पार्श्वभूमीवर दैनिक आरंभपर्व पुणेने "मिशन पुणे महानगरपालिका 2025" या विशेष सदरामधून विविध इच्छुक उमेदवारांशी संवाद साधण्याची मालिका सुरू केली आहे. या मालिकेअंतर्गत खडकवासल्याचे माजी सरपंच संतोष उर्फ दिवाकर मते यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी आपले विचार स्पष्ट आणि आत्मविश्वासाने मांडले.

संतोष मते म्हणाले — “मी पैशासाठी किंवा सत्तेसाठी नव्हे, तर प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी राजकारण करत आहे. खडकवासला, धायरी आणि शिवणे या भागांमध्ये पुणे महानगरपालिकेच्या सुविधा मनापासून लोकांपर्यंत पोहोचवायच्या आहेत. प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत, हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. विकास हा प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचला पाहिजे, तेव्हाच खरी सेवा घडेल.”

सरपंचपदाच्या काळात त्यांनी गावाच्या विकासासाठी अनेक कामे केली – रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामविकास या क्षेत्रात त्यांनी ठोस पावले उचलली. त्यांच्या कार्यकाळात गावातील नागरिकांचा सहभाग वाढवून त्यांनी लोकशाही विकासाचा एक आदर्श नमुना उभा केला.

त्यांनी पुढे सांगितले की, “गावातून सुरू झालेली ही सेवा आता शहरापर्यंत नेण्याची वेळ आली आहे. मला विश्वास आहे की नागरिकांच्या आशीर्वादाने मी हा प्रभाग एक आदर्श प्रभाग बनवू शकतो.”

अलीकडेच त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री मा. मुरलीधर (अण्णा) मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त ‘फिरते आरोग्य तपासणी शिबिर’ सुरू केले आहे. या शिबिरात रक्तदाब, साखर, हृदयविकार, हिमोग्लोबिन आणि इतर तपासण्या मोफत करण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये त्यांच्या कामाचे मोठे कौतुक होत आहे.

संतोष मते यांच्या सामाजिक कामाची आवड, नागरिकांशी असलेले जवळचे संबंध आणि प्रामाणिक कामाची शैली यामुळे प्रभाग क्रमांक 33 मध्ये त्यांची चांगलीच चर्चा होत आहे .

त्यांच्या नेतृत्वाखाली प्रभागातील सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात बदल घडविण्याची उमेद जनतेत दिसते. प्रामाणिक सेवा, पारदर्शक कामकाज आणि विकासाची दिशा हेच त्यांचे ब्रीदवाक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रत्येकाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील

## कोल्हे दाम्पत्याचा पुढाकार : प्रभाग क्रमांक ३३ – खडकवासला, धायरी, शिवणे परिसर








**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत चुरस वाढली आहे. प्रभाग क्रमांक 33 मध्ये विकास, सेवा आणि संघटन या तीनही स्तरांवर काम करणारे नाव म्हणजे प्रदेश भाजपा ओबीसी सचिव दत्ताभाऊ कोल्हे आणि खडकवासला भाजपा सरचिटणीस धनश्री कोल्हे.

या दाम्पत्याने गेल्या काही वर्षांत समाजात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असून, लोकांच्या प्रश्नांशी प्रत्यक्ष जोडून काम करण्याची त्यांची पद्धत नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणारी ठरली आहे.

दैनिक आरंभपर्व पुणेच्या ‘मिशन महानगरपालिका 2025’ या विशेष सदरामध्ये कोल्हे दाम्पत्याने संवाद साधत आपले विचार मांडले.

सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले दत्ताभाऊ कोल्हे हे आपल्या शांत आणि संयमी स्वभावामुळे ओळखले जातात. त्यांनी कार्यकर्त्यांशी सतत संवाद साधत संघटन बळकट केलं आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची वृत्ती ही त्यांची खास ओळख आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार - “राजकारण हे सत्तेसाठी नव्हे, तर जनतेच्या सेवेसाठी आणि विकासासाठी असायला हवं. माझं ध्येय म्हणजे प्रभाग क्रमांक 33 मधील प्रत्येक नागरिकाला चांगल्या सुविधा, स्वच्छ वातावरण आणि सुरक्षित जीवनमान देणं.”

त्यांच्या नेतृत्वाखाली प्रभागात अनेक सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबवले गेले आहेत. अलीकडेच त्यांनी विविध भागात फिरते आरोग्य तपासणी शिबिरे, तसेच सामाजिक संवाद मेळावे आयोजित करून नागरिकांशी थेट संवाद साधला.

त्यांच्या सोबत कार्यरत असलेल्या धनश्री कोल्हे या प्रभागातील महिलांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरल्या आहेत. त्यांनी महिलांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले — रक्षाबंधन सोहळे, शिवपार्वती विवाह कार्यक्रम, दिवाळी सरंजाम वितरण, महिला आरोग्य तपासणी शिबिरे, सामाजिक जनजागृती उपक्रम इत्यादी.

या सर्व उपक्रमांमुळे धनश्रीताईंची प्रतिमा एक जनसंपर्कशील, संवेदनशील आणि कार्यक्षम महिला नेत्या म्हणून तयार झाली आहे.

त्या म्हणतात, “महिलांचा सन्मान, शिक्षण, आरोग्य आणि सहभाग हेच समाजाच्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत. महिलांना आत्मनिर्भर बनवणे, त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे हेच माझं उद्दिष्ट आहे.”

कोल्हे दाम्पत्याचा सेवाभाव, संघटन कौशल्य आणि विकासाभिमुख विचार हे त्यांना इतरांपेक्षा वेगळं बनवतात. त्यांनी प्रभागातील नागरिकांमध्ये राजकीय आणि सामाजिक जागरूकता निर्माण करण्याचे काम केले आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली प्रभागात सामाजिक एकता आणि विकासाची नवी दिशा दिसू लागली आहे. भारतीय जनता पार्टी कडून ते सध्या प्रभाग क्रमांक 33 मध्ये त्यांच्या नावाची जोरदार चर्चा असून, दोघांचीही प्रबळ दावेदारी मानली जात आहे.

त्यांची कामगिरी, लोकांशी असलेला थेट संपर्क आणि विकासाचा दृष्टिकोन यामुळे नागरिक त्यांच्याकडे आश्वासक नेतृत्व म्हणून पाहत आहेत.




## थोडक्यात पण महत्वाचे



### हजारो नागरिकांना निलेश गिरमे यांच्याकडून मोफत भाजीवाटप

**धायरी (आरंभ पर्व) : धायरी परिसरात संकल्प प्रतिष्ठान युवासेना अध्यक्ष निलेश गिरमे यांनी महिलांसाठी मोफत भाजीवाटपाचा सुंदर उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाला परिसरातील नागरिक आणि महिलांकडून खूप मोठा प्रतिसाद मिळाला. रविवार, दि. 9 नोव्हेंबर रोजी धायरी येथील यशवंत विहार परिसरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कापडी पिशवी घेऊन आलेल्या महिलांना ताज्या भाज्या मोफत देण्यात आल्या. हजारो नागरिकांना मोफत भाजीवाटप करण्यात आले..निलेश गिरमे म्हणाले, “हा उपक्रम फक्त आजपुरता नाही. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी प्रभाग क्रमांक 34 मधील वेगवेगळ्या भागात आम्ही मोफत भाजीवाटप करू. शेतकरी बांधवांचा सन्मान आणि जनतेची मदत हेच आमचं उद्दिष्ट आहे.” गिरमे यांच्या या उपक्रमाचे नागरिकांनी मनापासून कौतुक केले. जनतेसाठी नेहमी पुढे राहणारा गिरमे परिवार यानिमित्त पुन्हा एकदा लोकांच्या चर्चेत आला आहे. माणुसकी आणि सेवा हाच खरी राजकारणाचा मार्ग आहे. हे या माध्यमातून गिरमे यांनी दाखवून दिले आहे. या कार्यक्रमासाठी संकल्प प्रतिष्ठानच्याराम तोडकरी मनोज चव्हाण प्रशांत जाधव चेतन कौंद्रे विनोद राठोड अदित्य बैकर भूषण वाघमारे गणेश राठोड सोरभ जगताप लोकेश राठोड ह्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.**

### अध्यक्षांची ब्लू ओशन कॉर्पोरेशन ॲड्वायजरी बोर्डावर नियुक्ती



**पुणे (आरंभ पर्व) : भारताच्या आर्थिक विकास आणि व्यावसायिक विकास क्षेत्राप्रती आपली वाढती बांधिलकी अधोरेखित करत, ब्लू ओशन कॉर्पोरेशन या लंडन येथे मुख्यालय असलेल्या आणि पुरवठा साखळी सल्लागार आणि प्रशिक्षणामध्ये जागतिक स्तरावर प्रथम क्रमांकावर असलेल्या उद्योगसमूहाने, नीती आयोगातील (NITI Aayog - National Institution for Transforming India) कर धोरण सल्लागार गटाचे (Consultative Group on Tax Policy) अध्यक्ष श्री पुष्पिन्दर एस. पुनिहा यांची आपल्या सल्लागार मंडळात (Advisory Board) नियुक्ती केल्याची घोषणा केली आहे.**

## थोडक्यात पण महत्वाचे




### ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर निश्चित करतो फॅशनचा पुढचा प्रवास

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : फॅशन क्षेत्रातील भारतातील सुप्रसिद्ध असलेला ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर, 2025 मध्ये आणखी एका शानदार आवृत्ती घेऊन परत येत आहे जिथे फॅशन, क्रिएटिव्हीटी आणि संस्कृती या तिन्ही गोष्टी एकत्र येतात आणि 'द वन अँड ओन्ली' असे केवळ एकच व्यासपीठ तयार करतात जे फॅशनमध्ये पुढील मोठे पाऊल ठरणार आहे. जिथे ट्रेंड्स बहुतेकदा क्षणभंगुर असतात तिथे फॅशन टूरने सर्वात धाडसी पाऊल उचलले आहे आणि फॅशनला पुढे नेण्याचा आणि 'फॅशनचा पुढचा प्रवास' निश्चित करण्याचा अर्थ काय आहे याची कल्पना पुन्हा मांडली आहे. ही फक्त एक थीम नाही - तर ती एक घोषणा आहे, एक निश्चित विधान आहे की, फॅशनचा पुढचा अध्याय कुठेही सुरू होत नसून तो ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या टप्प्यांवर सुरू होतो. फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) सोबत पुन्हा एकदा एकत्रीकरण करत, फॅशन टूर भारतातील प्रसिद्ध आणि अग्रेसर अशा डिझायनर्स आणि प्रसिद्ध स्टाईल क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणते जेणेकरून फॅशनच्या क्षेत्रात कधीही न पाहिलेले अनुभव सादर करता येतील.

### अमृता खानविलकर यांचा कलंक निर्मूलन मोहिमेला पाठिंबा



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : ZEE5 ची मराठी ओरिजिनल मालिका बाई तुझ्यापायी ही केवळ लोकांच्या हृदयाला भिडलेली कथा नाही, तर तिने एक सामाजिक चळवळ निर्माण केली आहे. या मालिकेत दाखवलेली अहिल्याची धैर्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रवासकथा आता महाराष्ट्रात मासिक पाळीवरील कलंक आणि लैंगिक असमानतेविरोधात चर्चा सुरू करण्याचे कारण ठरली आहे.#मीपणअहिल्या या मोहिमेद्वारे ZEE5 ने कलाकार, प्रभावशाली व्यक्ती, विद्यार्थी आणि नागरिकांना एकत्र आणले — अहिल्याचा साधा पण ताकदवान प्रश्न "का?" (Why?) पुन्हा विचारण्यासाठी. जे एका मालिकेतून सुरू झाले, ते आता वास्तवातील चळवळ बनले आहे — लोकांनी आपल्या लाल तळहातांनी ऐक्य आणि सामर्थ्याचे प्रतीक म्हणून आवाज उठवला आहे, मौन आणि लज्जेविरुद्ध. या मोहिमेने सर्जनशीलतेचा वापर रस्त्यांवर आणि स्क्रीनपलीकडेही केला. डोंबिवलीतील कॉलेज थिएटर ग्रुप्सनी हृदयस्पर्शी स्ट्रीट प्ले सादर केले, आणि प्रत्येक नाटकाच्या शेवटी प्रेक्षकांनी लाल तळहात उंचावले — सार्वजनिक ठिकाणे संवाद आणि परिवर्तनाचे व्यासपीठ बनली.









# हडपसर-सातववाडी प्रभागात रंगणार हायव्होल्टेज सामना !

## राष्ट्रवादी (अजित पवार गट) व भाजप आमनेसामने येणार का?




**अभिषेक मरगळे**

**हडपसर (दै. आरंभ पर्व)**
हडपसर-सातववाडी या नव्या प्रभाग क्रमांक १६ मध्ये येणाऱ्या महापालिका निवडणुकीत सत्ताधारी महायुतीतीलच दोन मोठे घटक — भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) — आमनेसामने येण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. या दोन्ही पक्षांची संघटनात्मक ताकद जवळजवळ समसमान असल्याने येथे 'घरच्यांमध्येच हायव्होल्टेज लढत' पाहायला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पूर्वीचा प्रभाग क्रमांक 23 (हडपसर गावठाण-सातववाडी) आता नव्या रचनेनुसार 16 झाला असून, त्यात जुना प्रभाग 22 चा काही भागही समाविष्ट करण्यात आला आहे. परिणामी या प्रभागाची लोकसंख्या ९२ हजार २३२ इतकी झाली आहे. २०१७ च्या निवडणुकीत या भागातून राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे प्रत्येकी दोन नगरसेवक निवडून आले होते.

राष्ट्रवादीकडून योगेश ससाणे आणि वैशाली बनकर, तर भाजपकडून जंगले आणि मारुती तुपे हे निवडून आले होते.

भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गट सध्या महायुतीत असले तरी, स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षांतील इच्छुकांची चुरस चांगलीच वाढली आहे. त्यामुळे या दोन्ही पक्षांमध्ये आंतरसंघर्ष पेटण्याची शक्यता आहे. प्रत्येक इच्छुक उमेदवाराने आपापले कार्यकर्ते सक्रिय करून प्रचारयंत्रणा सुरू केली आहे.



भाजपकडून संदीप दळवी, मारुती तुपे, युवराज मोहरे, नितीन होले, विजय मोरे या पुरुष नेत्यांसह स्मिता गायकवाड, सोनल कोद्रे, उज्वला जंगले, नलिनी मोरे या महिला कार्यकर्त्या चर्चेत आहेत.

तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून वैशाली बनकर, वर्षा पवार, सुवर्णा जगताप, निर्मला विचारे, योगेश ससाणे, आदिनाथ भोईटे, सागर भोसले आणि कमलेश कापरे हे संभाव्य उमेदवार म्हणून पुढे येत आहेत.

शिवसेना (शिंदे गट) कडून उल्हास तुपे आणि अभिमन्यू भानगिरे यांची नावे चर्चेत आहेत.

महाविकास आघाडीतून (राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट) इच्छुकांची संख्याही मोठी आहे. वैभव डांगमाळी, प्रशांत सुरसे, नितीन आरु, गणेश फुलारे, विजय देशमुख, विनायक बोराटे, संजय सपकाळे, विद्या होडे अशी नावे पुढे येत आहेत. या आघाडीने एकत्रित लढत दिल्यास भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटासमोर मोठे आव्हान उभे राहू शकते.

### नव्या समीकरणांचा खेळ?

**दरम्यान, या भागात पंधरा वर्षांपूर्वी स्थापन झालेली 'हडपसर विकास आघाडी' आठवली जात आहे. त्या वेळी या आघाडीचे दोन उमेदवार निवडून आले होते. यंदाही जर अधिकृत पक्ष तिकीट न मिळालेल्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन स्वतंत्र आघाडी केली, तर या प्रभागातील निवडणूक अधिकच रंगतदार होणार यात शंका नाही. एकूणच पाहता, हडपसर-सातववाडी प्रभागात महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही गटांतून इच्छुकांची चुरस असल्याने या वेळी लढत चौकोनी होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि भाजप आमनेसामने आले, तर स्थानिक राजकारणात अनेक वर्षांनी नव्या समीकरणांचा तिढा निर्माण होईल, अशी चर्चा सुरू आहे.**

## हातभट्टी दारुसह १० लाखाहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त


लोणी काळभोर पोलिसांची कारवाई

**चंद्रकांत दुंडे**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
लोणी काळभोर पोलीसांनी अवैधरित्या दारुची वाहतुक करणाऱ्यास ठोकल्या बेडया, २,१०,०००/- रुपयांचे गावठी हातभट्टी दारु सह १०,१०,०००/- रु चा मुद्देमाल केला जप्त. दिनांक १०नोव्हेंबर२५ रोजी १. वा. चे सुमारास थेऊर फाटा ते केसनंद रोडचे दिशेने एक पांढऱ्या रंगाचा महेंद्रा पिकअप टेम्पो चालला असून त्यामध्ये गावठी हातभट्टीचे कॅन भरलेले असल्याची बातमी लोणी काळभोर पोलीसांना प्राप्त झाली. त्यावर लागलीच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पन्हाळे यांनी थेऊर पोलीस चौकीस नेमणुकीस असलेले पोलीस उप निरीक्षक रत्नदिप बिराजदार, पोलीस उप निरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवा. दिगंबर जगताप व पोलीस शिपाई अमोल जाधव यांना बातमीप्रमाणे खात्री करुन कारवाई करणेकरीता रवाना केले.सदर कारवाई करीता नेमणेत आलेले वरिल नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी प्राप्त बातमीनुसार खात्री करुन चिंतामणी हायस्कुल थेऊर चौक येथे सापळा रचुन १.४५ वा. चे सुमारास एक संशयीत पांढऱ्या रंगाचा महेंद्रा पिकअप टेम्पो नं. एम एच १२ एम व्ही ५०१७ हे चारचाकी वाहन ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. परंतु वाहन चालकाने पिकअप न थांबवता अतिशय भरधाव वेगाने पुढे नेला. त्यावर लोणी काळभोर पोलीसांनी सदर वाहनाचा दुचाकी वरुन पाठलाग करुन थेऊर स्मशानभुमी जवळ १.५० वा. वाहनास ताब्यात घेतले. सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये लाकडी मुश्याची पांढरी पोते भरलेले व त्यामध्ये काळया, निळया व पिवळ्या रंगाचे प्लास्टीकचे बरेच कॅन दिसून आले. सदर कॅन ची तपासणी केली असता त्यामध्ये गावठी हतभट्टी दारु असल्याचे पोलीसांचे निदर्शनास आले.

## गोरगरिबांच्या पोटावर घाव, अश्रूंनी ओले झाले चौपाटीचे दगड

**लक्ष्मण साबळे**

- **सहा ठिकाणांवरील धार्मिक स्थळे, चौपाटी, हॉटेल्स आणि स्टॉल्स हटविले**
- **२०,००० चौ.फु. क्षेत्रातील अतिक्रमणे जमीनदोस्त**
- **महिलांचा ठिय्या आंदोलन, आत्मदहनाचा इशारा**
- **राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप – प्रशासनाशी चर्चा**



### सुप्रिया सुळे, आ. तापकीर व रूपाली चाकणकर यांचा हस्तक्षेप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला धरणाच्या काठावर सोमवारी (११ नोव्हेंबर) सकाळी सूर्य उगवला तो नेहमीप्रमाणेच... पण काही क्षणांतच चौपाटीवरचा तो शांत सकाळचा माहोल अश्रूंनी, आक्रोशांनी आणि गोंधळाने व्यापला. पाटबंधारे विभागाच्या पथकांनी जेव्हा जेसीबी चालू केली, तेव्हा केवळ माती नव्हे तर अनेक गरीबांच्या आशाही तुटल्या.

धरण परिसरातील धार्मिक स्थळे, चौपाट्या, हॉटेल्स आणि फेरीवाल्यांची अतिक्रमणे हटवण्यासाठी पाटबंधारे विभागाने महापालिका, महसूल आणि पोलीस विभागाच्या सहकार्याने तब्बल २० हजार चौरस फूट क्षेत्रातील सहा ठिकाणांवरील अतिक्रमणे जमीनदोस्त केली.

शाखा अभियंता गिरीजा कल्याणकर-फुटाणे यांच्या नेतृत्वाखाली सलग दहा तास चाललेल्या या कारवाईत नांदेड सिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अतुल भोस यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस फौजफाटा तैनात होता.

कारवाईची बातमी समजताच महिलांनी जागेवर ठिय्या मांडला. काहींच्या हातात लहान मुले, काहींच्या डोळ्यात अश्रू. "आमचं जगणं हिरावू नका, आमच्या लेकरांच्या तोंडचा घास घेऊ नका!" — असा हंबरडा फुटला. काही महिलांनी भावनावश होऊन आत्मदहनाचा इशारा दिला. या वेळी माझी तालुका हवेली प्रमुख संदीप मते, माजी सरपंच सौरभ मते, मनसेचे विजय मते, शुक्राचार्य वांजळे, माजी सरपंच गोकुळ करंजावणे , भाजप नेते दत्ताभाऊ कोल्हे, रमेश करंजावणे आणि माजी सरपंच संतोष मते, भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी घटनास्थळी धाव घेऊन प्रशासनाशी चर्चा केली.

त्यांनी प्रशासनाला बजावले . "धरण स्वच्छ ठेवा, पण माणुसकी गमावू नका! गरीबांच्या हातचं काम, पोटचं अन्न हिरावणं हा अन्याय आहे." या घटनेची माहिती खा. सुप्रिया सुळे ,महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आणि आमदार भीमराव तापकीर यांच्यापर्यंत पोहोचली. सर्वांनी प्रयत्न केले मात्र अखेर चौपाटीवरील अतिक्रमणे काढण्यामध्ये प्रशासनाने कोणतीही हयगय केली नाही.

धरण परिसरात काही फार्महाऊसेस, हॉटेल्स आणि बेकायदा धार्मिक बांधकामे उभारली होती. यामुळे धरणातील पाण्याचे प्रदूषण वाढत होते. शासनाने याची कबुलीही दिली होती. पण आजच्या कारवाईचा फटका मात्र त्या गोरगरिबांना बसला जे रोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत चहा, भेळ, मक्याचा ठेला चालवून संसाराचा गाडा ओढत होते. त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांचे छोटे टपरे, ओट्यावरील चुली आणि मेहनतीने उभारलेली उपजीविका एका झटक्यात उद्ध्वस्त झाली.जेसीबीच्या आवाजात त्यांच्या रडण्याचा आवाज दाबला गेला, पण त्यांची व्यथा धरणाच्या पाण्यात घुमत राहिली.

# भाडेकरू मालक होऊ शकत नाही!

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
सर्वोच्च न्यायालयानं प्रॉपर्टी मालकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा अत्यंत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल रद्द करत सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे की — भाडेकरू ५ वर्षे असो वा ५० वर्षे, कितीही काळ एखाद्या घरात राहिला तरी तो त्या मालमत्तेचा मालक ठरू शकत नाही.



हा निर्णय ज्योती शर्मा विरुद्ध विष्णू गोयल या प्रकरणात देण्यात आला. या निकालामुळे भाडेकरू आणि घरमालक यांच्यातील 'दीर्घकाळ वास्तव्य = मालकी हक्क' या गोंधळाचा शेवट झाला आहे. सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट सांगितलं की — "भाडेकरू हा घरमालकाच्या परवानगीने घरात राहतो. त्यामुळे त्याच्या वास्तव्यावर मालकी हक्क लागू होत नाही." या निर्णयामुळे प्रॉपर्टी मालकांना कायदेशीर संरक्षण मिळालं असून, दीर्घकाळ भाडे तत्वावर राहून मालकीचा खोटा दावा करणाऱ्यांना धक्का बसला आहे.

दिल्लीतील या प्रकरणात ज्योती शर्मा यांनी त्यांच्या भाडेकरू विष्णू गोयल यांना घर खाली करण्याची नोटीस दिली होती. गोयल गेली ३० वर्षे त्या घरात राहत होते आणि त्यांनी दावा केला की ते १९८० पासून या प्रॉपर्टीमध्ये सतत वास्तव्य करत आहेत. गोयल यांनी "adverse possession" या तत्वाखाली मालकीचा दावा दाखल केला. त्यांच्या मते, १२ वर्षांहून अधिक काळ सतत ताबा असल्याने १९६३ च्या Limitation Act नुसार ते मालकी हक्कासाठी पात्र आहेत.

मात्र शर्मा यांनी हे दावे फेटाळले आणि सांगितले की, गोयल हे त्यांच्या परवानगीनेच भाडेकरू म्हणून राहत होते. त्यामुळे त्यांचं वास्तव्य मालकीचा पुरावा ठरू शकत नाही. सुरुवातीला दिल्ली उच्च न्यायालयानं दीर्घ वास्तव्याच्या आधारावर गोयल यांच्या बाजूने निकाल दिला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या जस्टिस जे. के. महेश्वरी आणि के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठानं हा निर्णय रद्द करत ज्योती शर्मा यांच्या बाजूने निकाल दिला.

न्यायालयानं निकाल देताना म्हटलं — "भाडेतत्व हे परवानगीवर आधारित नातं आहे, शत्रुत्वावर नाही. त्यामुळे घरमालकाच्या परवानगीने राहणारा भाडेकरू कितीही वर्षे राहिला तरी मालक ठरू शकत नाही."

न्यायालयानं याआधीच्या बलवंत सिंह विरुद्ध पंजाब सरकार (1986) आणि रविंद्रकुमार ग्रेवाल विरुद्ध मनजीत कौर (2019) या प्रकरणांचा संदर्भ दिला. न्यायालयानं स्पष्ट केलं की adverse possession फक्त तेव्हाच लागू होते जेव्हा एखादी व्यक्ती जाणीवपूर्वक आणि मालकाच्या हिताच्या विरुद्ध मालमत्ता ताब्यात घेते — हे तत्व भाडेकरूंच्या प्रकरणात लागू होत नाही.

कायदे तज्ज्ञांच्या मते, हा निकाल अत्यंत महत्त्वाचा आणि कठोर आहे. वरिष्ठ वकील राजीव धवन म्हणाले — "हा फक्त एक निर्णय नाही, तर 'कराराचं पावित्र राखा' असा सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट संदेश आहे."

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय भाडेकरूंच्या खोट्या मालकी दाव्यांना आळा घालणारा आणि घरमालकांना न्याय देणारा ठरला आहे.

## टीमच्या समन्वयामुळे रुग्णाचा जीव वाचवण्यात यश




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
मेडिकव्हर केएलई हॉस्पिटल, पिंपरी येथे गंभीर प्रसूतीनंतरच्या गुंतागुंतींवर यशस्वी उपचार घेतलेल्या एका ३५ वर्षीय महिलेचा पूर्णपणे बरा होऊन डिस्चार्ज देण्यात आला आहे. रुग्णाला २१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी येथे सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर प्रकृती बिघडल्यामुळे तिला २४ ऑक्टोबर २०२५ रोजी गंभीर अवस्थेत मेडिकव्हर केएलई हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. रुग्णाला प्री-एक्लॅम्पसिया, प्लॅसेंटल अब्रप्शन, आणि ३६ आठवड्यांवर गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचे निदान झाले होते. त्यासोबतच ती प्रसूतीनंतरचा अतिरक्तस्त्राव (PPH), अकस्मात मूत्रपिंड निकामी होणे (AKI), सेप्सिस, डिसेमिनेटेड इंट्रावॅस्क्युलर कोअग्युलेशन (DIC) आणि थ्रोम्बोटिक मायक्रोअँजिओपथीचा संशय अशा गुंतागुंतींनी ग्रस्त होती. डॉ. रिजवान अब्दुल हकीम मलिक (फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट) यांच्या नेतृत्वाखाली आणि डॉ. शरयू राजेंद्र मिरजी (प्रसूती व स्त्रीरोग तज्ञ), डॉ. दीपक पाटील (प्लास्टिक सर्जन), आणि डॉ. पवन वाखरे (नेफ्रॉलॉजिस्ट) यांच्या बहुविषयक टीमच्या सहकार्याने रुग्णावर अत्यंत जटिल उपचार करण्यात आले. यात सेंट्रल लाईन व डायालिसिस कॅथेटर इन्सर्शन, हिमोडायलिसिस, आणि २४ ते २९ ऑक्टोबरदरम्यान चार वेळा प्लाझ्माफेरेसिस (प्लाझ्मा एक्स्चेंज) यांचा समावेश होता.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायलयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.